# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः18.05.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

१. इस्रोनं 101 व्या मोहिमेअंतर्गत EOS-09 हा पृथ्वी निरीक्षण उपग्रह यशस्वीपणे प्रक्षेपित करून गाठला ऐतिहासिक टप्पा

२. ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्र्वभूमीवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरोधात भारताची सात बहुपक्षीय शिष्टमंडळं जगभर देशाची भूमिका मांडणार

३. ऑपरेशन सिंदूरसंदर्भात सेना दलांच्या गौरवार्थ भाजपच्यावतीनं ठिकठिकाणी काढण्यात येत असलेल्या तिरंगा यात्रांना चांगला प्रतिसाद

४. बांगलादेशातून भारतात बंदरमार्गे आयात केल्या जाणाऱ्या आणखी वस्तूंवर निर्बंध जारी आणि

५. आयपीएलमध्ये कोलकाता नाइट रायडर्स स्पर्धेच्या बाहेर, रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरु गुण तालिकेत पहिल्या क्रमांकावर

**इस्रो**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोनं आपल्या 101 व्या अंतराळ मोहिमेअंतर्गत EOS-09 या पृथ्वी निरीक्षण उपग्रहाचं यशस्वीरीत्या प्रक्षेपण करून ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. आंध्र प्रदेशातील श्रीहरीकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रावरून इस्रोच्या पीएसएलव्ही- सी61 या रॉकेटच्या सहाय्यानं सकाळी 5 वाजून 59 मिनिटांनी तो प्रक्षेपित करण्यात आला. या मोहिमेत हा उपग्रह सूर्याच्या ध्रुवीय कक्षेत स्थापित केला जाणार आहे. सतत आणि खात्रीशीर रिमोट सेन्सिंग डेटा उपलब्ध होण्याच्यादृष्टीनं EOS-09 उपग्रहाद्वारे रचना करण्यात आली आहे. त्याद्वारे मिळणारी माहिती विविध क्षेत्रात विशेषतः कृषी-वाणिज्य क्षेत्रासाठी उपयोगी असेल. या उपग्रहात सिंथेटिक ॲपर्चर रडार बसवण्यात आलं आहे, त्यामुळे कुठल्याही हवामानात पृथ्वीच्या पृष्ठभागाची छायाचित्रं उपलब्ध होऊ शकणार आहेत.

**बहुपक्षीय शिष्टमंडळ**

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाविरोधात भारताची भूमिका मांडण्यासाठी केंद्र सरकार सात बहुपक्षीय शिष्टमंडळं विविध देशांमध्ये पाठवणार आहे. या महिन्याच्या अखेरीला ही शिष्टमंडळं संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या सदस्यांसह प्रमुख भागीदार देशांना भेट देतील. संसदीय कार्य मंत्री किरण रिजिजू यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये देशाचं प्रतिनिधीत्व करणाऱ्या खासदारांची आणि शिष्टमंडळाची यादी सामायिक केली आहे. भाजपचे खासदार वैजयंत पांडा यांच्या नेतृत्वाखालील पहिला गट सौदी अरेबिया, बहारिन, कुवेत आणि अल्जीरिया

या देशांचा दौरा करेल. भाजपचे खासदार निशिकांत दुबे आणि एनआयएमचे खासदार असदुद्दीन ओवैसी यांचा या गटात समावेश असेल.
भाजपाचे खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील दुसरं शिष्टमंडळ यूके, फ्रान्स, जर्मनी, यूरोपीय संघ, इटली और डेनमार्क ला भेट देईल. जदयूचे खासदार संजय कुमार झा यांच्या नेतृत्वाखालील तिसरं शिष्टमंडळ इंडोनेशिया, मलेशिया, दक्षिण कोरिया, जपान आणि सिंगापुरचा दौरा करेल. शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ यूएई, लाइबेरिया, कांगो आणि सिएरा लियोनचा दौरा करेल. काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ अमेरिका, पनामा, गयाना, ब्राजील और कोलंबियामध्ये भारताची भूमिका मांडेल तर द्रमुक खासदार कनिमोळी, स्पेन, ग्रीस, लाटव्हिया, स्लोव्हेनिया आणि रशियाला भेट देईल तर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वातलं शिष्टमंडळ इजिप्त, कतार, इथियोपिया आणि दक्षिण आफ्रिकेचा दौरा करेल.  या शिष्टमंडळात भाजपचे ज्येष्ठ नेते राजीव प्रताप रूडी आणि अनुराग सिंह ठाकूर यांच्या बरोबरच काँग्रेस खासदार मनीष तिवारी यांचा सहभाग असेल.

**अमित शहा ऑपसिंदूर**
ऑपरेशन सिंदूर हे भारताच्या सुरक्षा सिद्धांतातलं महत्त्वाचं वळण आहे, अशा शब्दात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्याची प्रशंसा केली. गुजरातमधील गांधीनगर इथं एका सभेत बोलताना शहा यांनी ऑपरेशन सिंदूर हा भारताच्या राष्ट्रीय सुरक्षा प्रतिसादाच्या धोरणातील ऐतिहासिक बदल ठरल्याचं नमूद केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या निर्णयक्षम नेतृत्वाखाली भारतीय सैन्य दलांनी पाकिस्तानच्या हद्दीपासून 100 किलोमीटरवर असलेल्या अगदी आतील भागात असलेल्या दहशतवादी तळांना अचूक लक्ष्य करून ते उद्धवस्त केले, असंही त्यांनी सांगितलं.

**तिरंगा यात्रा**
भारतीय सेनादलांनी हाती घेतलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशात ठिकठिकाणी तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत. उत्तराखंडमध्ये काल काढण्यात आलेल्या तिरंगा यात्रेत मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी सहभागी झाले होते. पुदुच्चेरी इथं पाँडिचेरी विद्यापीठातर्फे काढलेल्या तिरंगा यात्रेला नायब राज्यपाल के कैलासनाथन यांनी हिरवा झेंडा दाखवला, तर कुलगुरू डॉ प्रकाश बाबू, गृहमंत्री ए. नमशिवायम आणि आमदार कल्याणसुंदरम यांच्यासह अनेक पदाधिकारी, प्राध्यापक आणि विद्यार्थी त्यामध्ये सहभागी झाले होते. महाराष्ट्रातही जनसामान्यांमधे ऑपरेशन सिंदूरबद्दल अभिमान आणि गौरवाची भावना व्यक्त होत आहे. नवी मुंबई, गडचिरोली, कोल्हापूर, हिंगोली, भंडारा, सांगली, गोंदिया, तुळजापूर, पालघर, इत्यादी ठिकाणी मोठ्या उत्साहात तिरंगा यात्रा काढण्यात आल्या.

**बांगलादेश निर्बंध**
परदेशी व्यापार महासंचालनालयानं बांगलादेशातून भारतात बंदरांमध्ये आयात केल्या जाणाऱ्या काही वस्तूंवर नवे निर्बंध जाहीर केले आहेत. हे निर्बंध भारतमार्गे नेपाळ आणि भूतानला पाठविण्यात येणाऱ्या वस्तूंना लागू नसतील असंही केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं जारी केलेल्या अधिसूचनेत स्पष्ट केलं आहे. अधिसूचनेद्वारे जारी केलेले नवीन निर्बंध तत्काळ प्रभावानं अंमलात येतील.  बांगलादेशातून येणाऱ्या सर्व प्रकारच्या तयार कपड्यांच्या जमिनीवरील बंदरांवर आयातीस मनाई असेल. फक्त न्हावाशेवा आणि कोलकाता या दोन समुद्री बंदरांवरच बांगलादेशातून तयार कपड्यांच्या आयातीची मुभा असेल. याशिवाय फळं, फळांच्या स्वादाची शीतपेयं, प्रक्रिया

केलेले अन्नपदार्थ, कापूस आणि वाया गेलेला कापसाचा धागा, रंग अशा काही वस्तूंच्या आयातीलाही प्रतिबंध करण्यात आला आहे.

**पोलंड**

पोलंडमध्ये राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीची आज पहिली फेरी होणार आहे. विद्यमान राष्ट्राध्यक्ष आँद्रे डुडा यांचा दूसरा आणि अंतिम कार्यकाळ ऑगस्टमध्ये संपत असल्यानं या पदासाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी 13 उमेदवार रिंगणात आहेत. पोलंडची लोकसंख्या 3 कोटी 8० लाखाच्या आसपास आहे. यावेळच्या निवडणुकीत कोणत्याही उमेदवाराला बहुमताची अपेक्षा नसल्यानं पुढील महिन्याच्या 1 तारखेला मतदानाची अतिरिक्त फेरी घेतली जाण्याची शक्यता आहे. मोठ्या संख्येनं उमेदवार रिंगणात असूनही पहिल्याच फेरीत निर्णायक विजय अपेक्षित नाही.

**मणिपुरी एफआयआर**

समाज माध्यमावरून प्रसृत केलेल्या एका व्हिडिओ प्रकरणी मणिपूर पोलिसांनी कुकी विद्यार्थी संघटनेच्या दिल्ली शाखेच्या अध्यक्षाविरुद्ध एफआयआर दाखल केला आहे. पाओजाखुप गुईते असं या विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्षाचं नाव आहे. त्यानं प्रसृत केलेल्या व्हिडिओमध्ये तो रस्त्यावर जमलेल्या समुहाला संबोधित करताना कुकीबहुल भागात मैतेई समुदायाच्या आंदोलनावर निर्बंध घालण्याचं आवाहन करताना दिसत आहे. राज्याच्या उखरुल जिल्ह्यात शिरुई उत्सवासाठी मैती समाजाचे लोक येणार असल्याच्या पार्श्वभूमीवर हा व्हिडिओ पोस्ट करण्यात आला.

**कृषी मंत्री नागपूर**

केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून त्यामध्ये ते नागपूरला भेट देणार आहेत. या नागपूर भेटीत कृषी मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली  ‘विकसित कृषी’ या विषयावर उच्चस्तरीय बैठक होणार आहे तसंच ते नागपूर जिल्ह्याच्या प्रमुख कृषी विषयक आणि ग्राम विकास योजनांचाही आढावा घेतील. या दौऱ्यात चौहान यांच्या हस्ते ‘नॅशनल सॉईल स्पेक्ट्रल लायब्ररीचं’ उदघाटन करण्यात येईल. या कार्यक्रमात कृषी क्षेत्रासाठी नवोन्मेषी योगदान देणाऱ्या प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव केला जाईल.

**एएसआय**

आज आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिन साजरा होत आहे.या निमित्तानं भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग अर्थात एएसआयनं केलेल्या घोषणेनुसार देशभरातील सर्व एएसआयच्या अखत्यारीतील पुरातन स्थळं आणि संग्रहालयांमध्ये प्रवेश मोफत असेल. व्यापक जनसहभागाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं एएसआय ची 52 संग्रहालयं आणि सशुल्क प्रवेश असणारी स्मारकं जनतेसाठी कोणत्याही विनामूल्य  खुली राहणार असल्याचं केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयानं म्हंटलं आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये, पावसमुळं काल यजमान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुविरुद्ध कोलकाता नाइट रायडर्स हा सामना नाणेफेक होण्यापूर्वीच रद्द करण्यात आला. त्यामुळं गतविजेता कोलकाता नाइट रायडर्स संघ यंदाच्या आयपीएलमधून बाहेर पडला आहे. कालचा सामना रद्द झाल्यामुळं बंगळुरु संघ 12 सामन्यात 17 गुणांसह गुणतालिकेत पहिल्या

स्थानी पोहोचला. गुजरात टायटन्स 11 सामन्यात 16 गुणांसह आणि पंजाब किंग्ज 11 सामन्यात 15 गुणांसह अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत. दोन्ही संघांचा अद्याप एक सामना बाकी आहे. कोलकाता संघ, 13 सामन्यात 12 गुणांसह, आता स्पर्धेतून बाहेर पडला आहे. सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध त्यांचा अंतिम साखळी सामना केवळ औपचारिकता असून आज जयपूरमध्ये राजस्थान रॉयल्स विरुद्ध पंजाब किंग्ज आणि यजमान मेजवान दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध गुजरात टायटन्स अशा लढती होतील.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**